गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत
राज्य गुणवत्ता आश्वासन समिती व कक्ष,
विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती,
जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती व कक्ष
गठीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गो.ते. रुग्णालय, मुंबई ४११ ००१
शासन निर्णय क्र. गुनिका-२०१४/प्र.क्र.२७५/आरोग्य-३
दिनांक : २२ मे, २०१५.

प्रस्तावना:

गुणवत्ता नियमन करणे किंवा गुणवत्ता वाढविणे हा कुठल्याही क्षेत्राच्या यशाचा मूळ पाया आहे. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या मनुष्यबळाकडे योग्य दिशा, प्रशिक्षण, कसब व कामात रस नसेल, तसेच काम करण्याच्या पद्धतीत कमतरता व समन्वयाचा अभाव असेल तर गुणवत्ता ढासळते. गुणवत्ता ढासळल्यामुळे सर्वसामान्य जनतेला समाधानकारक वैद्यकीय सोयीसुविधा उपलब्ध होत नाहीत व परिणामी रुग्णांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होण्याची संभावना असते. त्यामुळे राज्यातील आरोग्याचे रक्षण, सुरक्षा व आरोग्याचे वर्धन केले जाईल व रुग्णांना सन्मानपूर्वक वागणूक मिळून त्यांचे चांगले समाधान होईल याकरिता चांगल्या व प्रामाणिक तसेच वस्तुस्थितीवर आधारित यंत्रणेकडून सार्वजनिक आरोग्याच्या विकासास प्रतिसाद देणे गरजेचे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यस्तरीय विभागप्रमुखांच्या केंद्र शासनाकडे झालेल्या दि. ३ व ४ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या राष्ट्रीय पातळीवरील बैठकीत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत दिलेल्या सुधारित सुचनांच्या अनुषंगाने राज्य स्तरावर राज्य गुणवत्ता आश्वासन समिती व राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष गठीत करणे, विभागीयस्तरावर विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती, तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती व जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्ष, तसेच जिल्हा रुग्णालय गुणवत्ता आश्वासन चमु, उपजिल्हा रुग्णालय (५० व १०० खाटा), ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय गुणवत्ता आश्वासन चमू व प्रा.आ.केंद्र गुणवत्ता आश्वासन चमू गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने खाली दर्शविलेल्या प्रमाणे (१) राज्य गुणवत्ता आश्वासन समिती गठीत करण्यास, (२) राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष स्थापन करण्यास, (३) विभागीयस्तरावर विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती स्थापन करण्यास, (४) जिल्हा स्तरावर जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती स्थापन करण्यास, (५) जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्ष स्थापन करण्यास व त्यानुषंगाने जिल्हा रुग्णालय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमु, उपजिल्हा रुग्णालय (५० व १०० खाटा), ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू, व प्रा.आ.केंद्र गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू स्थापन करण्यास शासन याव्दारे मान्यता देत आहे.

(१) राज्य गुणवत्ता आश्वासन समिती:

राज्य गुणवत्ता आश्वासन समिती स्थापन करण्यात येत असून सदर समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई | अध्यक्ष |
| २ | आयुक्त (कु.क) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | उपाध्यक्ष |
| ३ | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | संयोजक |
| ४ | संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |
| ५ | अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कु.क) पुणे | सदस्य सचिव |
| ६ | सह संचालक आरोग्य सेवा (रुग्णालये) मुंबई | सदस्य |
| ७ | सहसंचालक आरोग्य सेवा, मुंबई (प्रा.आ.कें - जिपस्तर) | सदस्य |
| ८ | प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर | सदस्य |
| ९ | उप संचालक आरोग्य सेवा (शुश्रुषा) मुंबई | सदस्य |
| १० | एक जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ११ | एक जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १२ | एक स्त्रीरोग तज्ञ, (Gynecologist) | सदस्य |
| १३ | एक शल्य चिकित्सक (Surgeon) | सदस्य |
| १४ | एक भूल तज्ञ (Anesthetist) | सदस्य |
| १५ | एक बालरोग तज्ञ, (Pediatrician) | सदस्य |
| १६ | एक भिषक (Medicine Specialist) | सदस्य |
| १७ | एक वैद्यकीय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| १८ | एक वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय | सदस्य |
| १९ | एक वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र | सदस्य |
| २० | नामांकित खाजगी रुग्णालय/एनजीओ प्रतिनिधी | सदस्य |
| २१ | विधी तज्ञ - न्याय व विधी विभाग, मंत्रालय | सदस्य |
| २२ | FOGSI/IMA/IAP/IAPSM/APH यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| २३ | महानगरपालिका व नगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| २३ | सहाय्यक संचालक तथा नोडल अधिकारी (गुणवत्ता आश्वासन) | समन्वयक सदस्य |

(१) (ब) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया संबंधित गुणवत्ता आश्वासन मार्गदर्शक सुचनेच्या पुस्तकामध्ये दर्शविलेली गुणवत्ता आश्वासन समिती उपरोक्त समितीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

तथापि, जिल्हा गुणवत्ता समिती कडून प्राप्त झालेल्या, कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या तक्रारी किंवा नुकसान भरपाई मागणी प्रकरणांबाबत दखल घेणे, निकाली काढणे तसेच तक्रारी किंवा नुकसान भरपाईबाबत अंतिम निर्णय घेणे याबाबत राज्य कुटुंब नियोजन विमा उपसमिती (State Family Planning Indemnity Subcommittee) सुध्दा खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत असून ती उपरोक्त राज्य गुणवत्ता समितीचाच एक उपभाग असेल व ती कुटुंब कल्याण विमा योजना, २०१३ (Family Planning Indemnity Scheme २०१३) अंतर्गत विहित केलेल्या नियमांनुसार व मुदतीत कार्यवाही करेल.

2.

<u>कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात विमा योजनेबाबत राज्यस्तरीय उपसमिती</u>

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त (कु.क) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | अध्यक्ष |
| २ | संचालक आरोग्य सेवा, मुंबई | उपाध्यक्ष |
| ३ | अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कु.क) पुणे | सदस्य सचिव |
| ४ | सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कु.क) | सदस्य |
| ५ | एक स्त्रीरोग तज्ञ, (Gynecologist), जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ६ | एक शल्य चिकित्सक (Surgeon), जिल्हा रुग्णालय | सदस्य |

<u>राज्य गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा :-</u>

राज्य गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे

(१) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम राबविण्यासंबंधी धोरणात्मक बाबी व मार्गदर्शक सूचना तयार करण्याबाबत मार्गदर्शन करणे व गुणवत्ता आश्वासन धोरण ठरविणे.

(२) सर्व शासकिय रुग्णालयांमध्ये देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा दर्जेदार असल्याबद्दल खात्री करणे.

(३) राज्य व जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

(४) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

(५) कुटुंब कल्याण विमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई प्रकरणांबाबत आढावा घेणे व अंतिम निर्णय घेणे.

(६) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात असल्याबद्दल खातरजमा करणे.

(७) गुणवत्ता आश्वासन विषयक प्रमुख निर्देशकांमधील कामगिरीचा आढावा घेणे.

सदर समितीच्या बैठका ६ महिन्यांतून किमान एकदा तरी होणे आवश्यक असेल.

(२) <u>राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष :-</u>

राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष हा राज्य गुणवत्ता आश्वासन समितीच्या देखरेखी खाली कार्य करेल. सदर कक्षामध्ये खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) पुणे | सहअध्यक्ष |
| ३ | सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम) मुंबई | सदस्य सचिव |
| ४ | सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) पुणे | सदस्य |
| ५ | प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर | सदस्य |
| ६ | राज्य गुणवत्ता आश्वासन सल्लागार, मुंबई | सदस्य |
| ७ | राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम सल्लागार (सार्वजनिक आरोग्य) | सदस्य |
| ८ | राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम सल्लागार (गुणवत्ता संनियंत्रण) | सदस्य |
| ९ | राज्य गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम सल्लागार (गुणवत्ता आश्वासन) | सदस्य |
| १० | कार्यक्रम सहाय्यक | सदस्य |

राज्य गुणवत्ता आश्वासन समितीचा भाग म्हणून राज्य गुणवत्ता आश्वासन कक्ष स्थापन करण्यात येत आहे. सदर कक्षाची कार्यकक्षा समिती प्रमाणेच राहील. त्याशिवाय खाली नमूद केलेली कार्यवाही सदर कक्षाकडून करण्यात येतील.

१. आरोग्य संस्थाच्या प्रत्येक स्तरावर टप्प्याटप्प्याने कार्यवाहीत आणता येऊ शकेल असा गुणवत्ता आश्वासन विकास आराखडा तयार करणे.
२. राज्य गुणवत्ता आश्वासन समितीच्या सदस्यांच्या आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या स्वतंत्र तसेच संयुक्त भेटी विविधि जिल्हयातील आरोग्य संस्थांना देण्यासाठी कार्यक्रम तयार करणे व भेटी देण्यात आल्यानंतर त्याचा अहवाल व शिफारशी विचारात घेण्यासाठी मसूदा तयार करणे.
३. राज्य कुटुंब नियोजन विमा उपसमितीच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी कशाप्रकारे होत आहे याचा आढावा घेणे.

(३) <u>विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती</u> :-

राज्य गुणवत्ता आश्वासन समितीच्या अंतर्गत विभागीय गुणवत्ता आश्वासन समिती स्थापन करण्यात येवून सदर समिती मध्ये खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | उपसंचालक, आरोग्य सेवा, संबंधित परिमंडळ | अध्यक्ष |
| २ | प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, संबंधित परिमंडळ | सहअध्यक्ष |
| ३ | सहाय्यक संचालक (वैद्यकीय) | सदस्य सचिव |
| ४ | सहाय्यक संचालक (मलेरिया) | सदस्य |
| ५ | जिल्हा शल्य चिकित्सक (परिमंडळ मुख्यालय) | सदस्य |
| ६ | जिल्हा आरोग्य अधिकारी (परिमंडळ मुख्यालय) | सदस्य |
| ७ | जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम अधिकारी (परिमंडळ मुख्यालय) | सदस्य |

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाच्या संनियंत्रण, मुल्यमापन, अहवाल संकलन-सादरीकरण व प्रशिक्षणाची जबाबदारी प्राचार्य,राज्य आरोग्य प्रशिक्षण संस्था तसेच प्राचार्य, आरोग्य व कुक प्रशिक्षण संस्था (संबंधित परिमंडळ) यांची राहील.

<u>विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा</u> :-

विभागीय गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे

(१) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम राबविण्यासंबंधी धोरणात्मक बाबी व मार्गदर्शक सूचना तयार करणे. त्यास राज्य समितीची मान्यता घेणे.
(२) केंद्रसरकारने आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणासाठी निर्गमित केलेल्या चेक-लिस्ट अंगीकारणे व राज्याच्या गरजेनुसार आवश्यकता असल्यास काही आवश्यक बाबींचा त्यात अंतर्भाव करणे. त्यास राज्य समितीची मान्यता घेणे.
(३) राज्यस्तरीय परिक्षक (Assessors) जिल्हास्तरीय गुणवत्ता आश्वासन चमू यांना आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता निर्धारणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना, पद्धती व चेक-लिस्ट बाबत प्रशिक्षण देणे.
(४) सर्व शासकिय रुग्णालयांमध्ये देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा दर्जेदार असल्याबद्दल खात्री करण्यासाठी परिमंडळनिहाय कृतीआराखडा तयार करणे.
(५) आरोग्य संस्थांना पूर्वनिर्धारित वेळापत्रकानुसार भेटी देणे.
(६) आरोग्य संस्थाच्या भेटीचा अहवाल, भेटीदरम्यान आढळलेल्या त्रुटी व त्यावरील उपाययोजना यासह, राज्यस्तरीय गुणवत्ता आश्वासन कक्षाला सादर करणे.
(७) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम विषयक प्रमुख निर्देशकांमधील (Key Performance Indicator)

कामगिरीचा आढावा घेणे. परिमंडळांतर्गत आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता आश्वासन अहवालांचे दरमहा संकलन, पृथ्थकरण व KPI च्या अनुषंगाने सादरीकरण करणे.

(८) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात असल्याबद्दल खातरजमा करणे.

(९) जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे व गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

(१०) कुटुंब कल्याण विमा योजनेंतर्गत प्रकरणांचा आर्थिक व भौतिक आढावा घेणे व जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीकडून निर्णय न झालेल्या प्रकरणांबाबत आढावा घेणे व अंतिम निर्णयार्थ राज्य समितीकडे सादर करणे.

सदर समितीची दर महिन्याला बैठक होईल व बैठकीचा अहवाल दरमहा राज्य समितीस पाठविण्यात येईल.

(४) <u>जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती :-</u>

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती जिल्हापातळीवर स्थापन करुन या समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प | सहअध्यक्ष |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | समन्वयक |
| ४ | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ५ | वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ६ | जिल्हा क्षयरोग अधिकारी / जिल्हा हिवताप अधिकारी/ सहाय्यक संचालक (कुष्टरोग) / इतर | सदस्य |
| ७ | वैद्यकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामीण रुग्णालय | सदस्य |
| ८ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र | सदस्य |
| ९ | जिल्हा गुणवत्ता नोडल अधिकारी | सदस्य |
| १० | एक स्त्रीरोग तज्ञ, (Gynaecologist) | सदस्य |
| ११ | एक शल्य चिकित्सक (Surgeon) | सदस्य |
| १२ | एक भूल तज्ञ, (Anesthetist) | सदस्य |
| १३ | एक बालरोग तज्ञ, (Paediatrician) | सदस्य |
| १४ | एक भिषक (Medicine Specialist) | सदस्य |
| १५ | पीएचएन/ परिचारिका संवर्गाशी संबंधित एक प्रतिनिधी | सदस्य |
| १६ | एक विधी तज्ञ - शासकिय अभियोक्ता | सदस्य |
| १७ | ईएसआय रुग्णालय/खाजगी रुग्णालय/इतर रुग्णालय/एनजीओ प्रतिनिधी | सदस्य |
| १८ | FOGSI/IMA/IAP/IAPSM/APH यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १९ | जिल्हा आरसीएच अधिकारी / सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी / तत्सम अधिकारी | सदस्य सचिव |

जिल्हा कुटुंबकल्याण विमा योजना उपसमिती (District Family Planning Indemnity Sub-committee) वरील समितीत समाविष्ट असेल व त्या अंतर्गत खालील नऊ सदस्यांची उपसमिती स्थापन करण्यात येत असून ती कुटुंबकल्याण विमा योजना, २०१३ (Family Planning Indemnity

Scheme २०१३) अंतर्गत शल्य चिकित्सक/ आरोग्य संस्था यांचे विरुध्द लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रार/दावा संबंधी विहित मुदतीत निर्णय घेईल.

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भीय प्रकरणांसाठी जिल्हास्तरीय उपसमिती

| | | |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी | समन्वयक |
| ३ | जिल्हा शल्यचिकित्सक | **सदस्य सचिव** |
| ४ | वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ५ | जिल्हा आरसीएच अधिकारी / सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी / तत्सम अधिकारी | समन्वयक |
| ६ | एक स्त्रीरोग तज्ञ, जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ७ | एक शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ८ | एक भूल तज्ञ, जिल्हा रुग्णालय | सदस्य |
| ९ | एक विकृती विशेषज्ञ, जिल्हा रुग्णालय | सदस्य |

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा :-

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे

(१) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाबाबतच्या मार्गदर्शक सुचना व धोरणे सर्व स्तरावर पोचविणे.

(२) आरोग्य सेवेमध्ये गुणवत्ता राखण्याचे निकष पाळण्याबाबत कार्यवाही करणे.

(३) कुटुंबकल्याण विमा योजना अंतर्गत प्रकरणांचा आढावा घेणे व नुकसानभरपाई देण्याबाबत निर्णय घेणे (कुटुंब नियोजन विमा योजनेसंबंधी शासन निर्णय दिनांक ९/५/२०१३)

(४) जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्ष व जिल्हा गुणवत्ता आश्वासन चमु मधील अधिकाऱ्यांचे कौशल्य वाढविणे

(५) जिल्हयात गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे

(६) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमातील कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे

(७) गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम जिल्हयात प्रभावीपणे राबविला जाण्याबाबत खातरजमा करणे

(८) राज्य गुणवत्ता आश्वासन समिती बरोबर गुणवत्ता दर्जा उंचावण्याबाबत समन्वय साधणे

सदर समितीची दर महिन्याला बैठक होईल व बैठकीचा अहवाल दरमहा विभागीय समितीस पाठविण्यात येईल.

(५) जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्ष :-

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीच्या देखरेखी खाली कार्य करण्याकरिता जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्ष स्थापन करण्यात येवून सदर कक्षामध्ये खालील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सहअध्यक्ष |
| ३ | जिल्हा आरसीएच अधिकारी | सदस्य सचिव |
| ४ | स्त्रीरोग तज्ञ | सदस्य |
| ५ | शल्य चिकित्सक | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६ | भूल तज्ञ | सदस्य |
| ७ | जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम सल्लागार (गुणवत्ता आश्वासन) | सदस्य |
| ८ | जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम, सल्लागार (सार्वजनिक आरोग्य ) | सदस्य |
| ९ | जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम, सल्लागार (गुणवत्ता संनियंत्रण) | सदस्य |
| १० | कार्यक्रम सहाय्यक | |

सदर कक्ष जिल्हयातील आरोग्य संस्थांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती व कक्ष यांना गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत उद्दीष्टे गाठण्याकरिता खालील चमू सहाय्य करतील.

- **जिल्हा रुग्णालय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू :-**

जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू जिल्हा रुग्णालयाच्या गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे कार्य करेल. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार काम करेल. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी वर्गांचा समावेश राहील :-

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| २ | प्रभारी अधिकारी- ऑपरेशन थियेटर,भूलतज्ञ,सर्जन,बालरोगतज्ञ,भिषक | सदस्य |
| ३ | स्त्रीरोग तज्ञ | सदस्य |
| ४ | रोगनिदानतज्ञ ( Pathologist ) | सदस्य |
| ५ | शुश्रुषा अधिकारी (मेट्रन)/ सहा.शुश्रुषा अधिकारी (असि.मेट्रन) | सदस्य |
| ६ | सिस्टर ईनचार्ज - एसएनसीयु/ ऑपरेशन थियेटर/ लेबर रुम | सदस्य |
| ७ | औषध निर्माण अधिकारी | सदस्य |
| ८ | भांडारपाल | सदस्य |
| ९ | अभिलेख अधिकारी | सदस्य |
| १० | अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |

- **उपजिल्हा रुग्णालय (५० व १०० खाटा), ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू -**

सदर गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू संबंधित रुग्णालयाच्या गुणवत्ता आश्वासनाचे कार्य करेल. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार काम करेल. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी वर्गांचा समावेश राहील :-

| | | |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक | अध्यक्ष |
| २ | प्रभारी अधिकारी- ऑपरेशन थियेटर,भूलतज्ञ,सर्जन,बालरोगतज्ञ,भिषक | सदस्य |
| ३ | स्त्रीरोग तज्ञ | सदस्य |
| ४ | रोगनिदानतज्ञ ( Pathologist ) | सदस्य |
| ५ | सहा.शुश्रुषा अधिकारी (असि.मेट्रन) | .सदस्य |
| ६ | सिस्टर ईनचार्ज - एसएनसीयु/ ऑपरेशन थियेटर/ लेबर रुम | सदस्य |
| ७ | औषध निर्माण अधिकारी | सदस्य |
| ८ | भांडारपाल | सदस्य |
| ९ | अभिलेख अधिकारी | सदस्य |

- **प्राथमिक आरोग्य केंद्र गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू -**

सदर गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम चमू संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाचे कार्य करेल. सदर चमू जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम कक्षाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार काम करेल. सदर चमूमध्ये खालील प्रमाणे अधिकारी वर्गांचा समावेश राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | तालुका आरोग्य अधिकारी | अध्यक्ष |
| २ | वैद्यकीय अधिकारी (संबंधित प्रा. आ. केंद्र) | सदस्य |
| ३ | औषध निर्माण अधिकारी | सदस्य |
| ४ | एएनएम (मुख्यालय) | सदस्य |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(शेखर ढवळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई
आयुक्त (कु.क) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (मानसिक आरोग्य) मुंबई
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) पुणे
सह संचालक आरोग्य सेवा (रुग्णालये) मुंबई
सह संचालक आरोग्य सेवा (जिपस्तर) मुंबई
जिल्हाधिकारी जिल्हा (सर्व),
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
उप संचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ (सर्व),
प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर,
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व),
रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षक (सर्व),
सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (आरोग्य -३)